नियोजन



# दुष्काळी भागासाठी तूर पिकाचा पर्याय



**डॉ. विकास नव्हाळे**
औरंगाबाद
(मो.नं. ९४२२५४५६०६)

तुरीचा इतिहास हा अतिशय प्राचीन आहे. खिस्तपूर्वी चारशे वर्षांपूर्वी बौद्ध साहित्यात तसेच चरकसंहितेतही तुरीचा उल्लेख आढळतो. कमी खर्चात सर्वाधिक प्रोटिन देणारे पीक म्हणून याकडे पाहिले जाते. यामुळे जेवणात तुरडाळीचा समावेश सर्वाधिक असतो.

गरिबापासून ते श्रीमंतापर्यंत सर्वत्र तूरडाळीचा वापर होतो. तूर हे प्रामुख्याने आफ्रिकेतील पीक आहे असे सांगितले जाते, मात्र नव्या संशोधनानुसार ते भारतीय पीक असल्याचे काही जणांचे म्हणणे आहे. खरीप हंगामात तुरीचे उत्पादन घेतले जाते. सर्वसाधारणपणे जून महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात तुरीचा पेरा केला जातो. तुरीसाठी जमीन मध्यम ते भारी प्रकारची व त्यातही पाण्याचा निचरा होणारी याला प्राधान्य दिले जाते. जमिनीचा सामू (पीएच) ५ ते ७ असावा लागतो. तुरीची मुळे खोलवर जात असल्यामुळे खोल नांगरणी व त्यावर दोन वेळा पाळी घालून जमीन भुसभुशीत केली जाते. काही शेतकरी तुरीत आंतरपीक घेतात तर काही जण केवळ तूरच पेरतात. काही जण दोन ओळींतील अंतर आठ फूट तर काही जण दहा फूट ठेवतात. दोन रोपांतील अंतर दीड फुटापासून चार फुटांपर्यंत ठेवले जाते. कोरडवाहू शेतीतही तूर पेरली जाते. आता नव्याने बागायती शेती करणारे ठिबक सिंचनाचा वापर तुरीच्या लागवडीसाठी करतात.

**सुधारित जाती :** प्रारंभीचे ३० ते ४० दिवस या पिकाची वाढ अतिशय सावकाश होते. २० ते २५ दिवसाला पहिली कोळपणी व त्यानंतर ३० ते ३५ दिवसांनंतर दुसरी कोळपणी केली जाते. आयसीपीएल ८७, एकेटी ८८११, विपुला, टी विशाखा १, बीडीएन २, बीएसएमआर ७३६, बीएसएमआर ८५३ या तुरीच्या सुधारित जातींचा वापर शेतकरी मोठ्या प्रमाणावर करीत आहेत. एकेकाळी तुरीचे सरासरी उत्पादन एकरी ४ क्विंटल होते. आता अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरून हे उत्पादन २० ते २५ क्विंटलपर्यंत नेणारे शेतकरी आहेत. शेतीत ऊस, द्राक्ष अशा पिकांतून मोठे उत्पादन मिळते, मात्र अवर्षणामुळे पाण्याचा प्रश्न निर्माण होत असल्यामुळे शेतकरी अडचणीत सापडतो आहे. पर्यायी पीक म्हणून बागायती शेतकरीही आता तुरीच्या उत्पादनाकडे मोठ्या प्रमाणात वळत आहेत. गेल्या काही वर्षात तुरीला मिळणाऱ्या भावामुळे शेतकरी तुरीच्या उत्पादनाकडे वळतो आहे. लातूर जिल्ह्यात गेल्या तीन वर्षांपासून सतत दुष्काळ होता. त्यामुळे फळबागा व ऊसाच्या शेतीपासून शेतकरी दूर गेला.

**आंतरपिके :** तूर पीक घेताना त्यासोबत शेतात इतर कोणती आंतरपिके घेता येणे शक्य आहे, याचा विचार शेतकऱ्यांकडून नेहमीच केला जातो. मात्र आंतरपिकांचे प्रमाण योग्य राखणे आवश्यक आहे. तूर- बाजरी (१:२), तूर- सूर्यफूल (१:२), तूर- सोयाबीन (१:३) किंवा (१:४), तूर- ज्वारी (१:२) किंवा (१:४), तूर- कापूस (१:६), तूर- भुईमूग, तूर- मूग (१:३), तूर- उडीद (१:२) अशी आंतरपिके घेता येणे शक्य आहे. तूर पीक घेतल्यावर आयपीसीएल- ८७ वाणाकरिता हेक्टरी १८ ते २० किलो बियाणे लागते. मध्यम मुदतीच्या एकेटी ८८११, विपुला, राजेश्वरीकरिता हेक्टरी १२ ते १५ किलो बियाणे लागते.

**पीक संरक्षण :** फुलोऱ्याच्या अवस्थेमध्ये आणि शेंगा भरावयाच्या अवस्थेमध्ये घाटे अळी, पिसारी पतंग, शेंग माशी या किडींमुळे ३० ते ४० टक्के नुकसान होते. यासाठी एकात्मिक कीड व्यवस्थापन पद्धतीने नियंत्रण करावे. तृणधान्याचे आंतरपीक असल्यास किडींचे प्रमाण कमी राहते. एचएएनपीव्ही या जैविक कीड नियंत्रकाचा वापर करावा. फुलकळी लागताना पहिली फवारणी निंबोळी अर्क ५ टक्के, दुसरी फवारणी पहिल्या फवारणीनंतर १२-१५ दिवसांनी हेलिओकिल ५०० मि.लि./ हेक्टरी आणि गरजेनुसार तिसरी फवारणी कोराजन २० टक्के प्रवाही १०० मि.लि. प्रतिहेक्टर ५०० लिटर पाण्यातून याप्रमाणे करावी. हे खरीप पीक असल्यामुळे ते पावसावर वाढते. पावसाचा खंड पडल्यास किंवा पाण्याचा ताण पडल्यास आणि सिंचनाची सुविधा असल्यास पिकाच्या वाढीच्या अवस्थेमध्ये (३०-३५ दिवस), फुलोरा अवस्थेत (३०-७० दिवस) आणि शेंगा भरावयाच्या अवस्थेमध्ये पाणी देणे आवश्यक आहे. ■